RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# कुरआन मधील स्त्री प्रतिमा

कु. बागवान तायराशगुफ्ता इकबाल
यशवंतराव चव्हाण इन्टिट्यूट ऑफ सायन्स. सातारा.

सारांश

*कुरआन हा इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ म्हणून सर्वपरिचित आहे. इस्लाम धर्मामध्ये कुरआनचे पठण होत असले तरीही त्याचे अर्थासह वाचन करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे आणि त्यातही महिलावर्गाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे या धर्मग्रंथात दिलेले आधिकार, विधी, निषेध याबाबत इस्लाम धर्मीय महिलांमध्ये जाणीव जागृती व्हावी आणि त्यांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी प्रस्तुत शोधनिबंध लिहिला आहे.*

*कुरआनच्या अवतरण काळापासून ते आजतागायत कुरआनवर विद्‌वानांनी बरेच संशोधन, चिंतन, लेखन केले. तरीदेखील त्याबाबत स्त्रियांमध्ये जाणीव जागृती झालेली दिसून येत नाही. पुरुषप्रधानतेमुळे कुरआनमधील आयतींचा सोईनुसार अर्थ लावून आज देखील स्त्रियांना अन्यायकारक वागणूक दिली जात आहे. त्याविरूद्ध स्त्रियांनी आवाज उठवलाच तर ते कुरआनच्या विरोधात असलेले वर्तन आहे असे सांगून तो दाबला जात आहे. आणि अशी ही अभिव्यक्तिस्वातंत्र्याची होणारी गळचेपी इस्लाम धर्मातील स्त्रीला काही नवीन नाही. त्यामुळे अल्लाहद्‌वारा दिले गेलेले अधिकार तरी किमान वापरता यावेत आणि त्याद्‌वारे होणाऱ्या फायद्यांचा उपभोग घेता यावा हा उद्‌देश ठेवून या शोधनिबंधाचे लेखन केले आहे. त्या अनुषंगाने या शोधनिबंधामध्ये कुरआनमध्ये आलेले स्त्रीविषयक विचार कुरआन अवतरण्यापूर्वी अरबस्तानमधील स्त्रियांची दुरवस्था, विवाह, पुनर्विवाह, बहुपत्नीत्व, तलाक, सदाचार, चारित्र्यसंपन्नता, बुरखा पद्धती, वारसा हक्क, व्यभिचारी स्त्री आणि शिक्षा, परलोकातील स्त्रीचे स्थान, स्त्री भ्रूणहत्या या मुद्यांचा आधार घेऊन हाताळले आहेत. शब्दसंख्येच्या मर्यादेमुळे मोजक्याच मुद्यांचा आणि आयतींचा विचार याठिकाणी केला आहे.*

बीज शब्द **-** कुरआन, स्त्री, आयत, इद्‌दत, तलाक, मेहेर

शोधपद्धती

कुरआनची भाषा ही मुळ अरबी आहे. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधासाठी कुरआनमधील स्त्रीविषयक आलेल्या आयतींची निवड केली आहे. तसेच त्या आयतींच्या मराठी भाषांतराच्या आधारे आणि विद्‌वानांच्या भाष्याच्या आधारे अर्थ लावून, संशोधनाच्या विवेचन पद्धतीचा स्वीकार करुन साधार मांडणी केली आहे.

शोधनिबंधाचा उद्‌देश

1. कुरआनमधील आधिकारांची स्त्रियांना जाणीव करून देणे.
2. अन्याय आणि अधिकारांच्या जाणीव जागृतीद्‌वारा स्त्रीसक्षमीकरण करणे.
3. कुरआनचे अर्थानुसार पठण करण्याची, स्वत:कडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देणे.

प्रस्तावनाः

कुरआन हा इस्लाम धर्मीयांचा पवित्र ग्रंथ मानला जातो. मोहम्मद पैगंबर या अंतिम प्रेषितांवर अल्लाहद्‌वारा कुरआनचे अवतरण झाले अशी मुस्लिम धर्मीयांची गाढ श्रद्धा आहे. इस्लाम धर्माची इमारत कुरआनच्याच आधारावर उभी आहे. कुरआनचे अवतरण होण्यासाठी त्यावेळची अरबस्तानमधील जी अनेक कारणे कारणीभूत ठरली आहे त्यापैकी एक कारण स्त्रियांची दूरवस्था. त्यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी अल्लाहद्वारा काही आयातींचे अवतरण झाले. त्या आयातींवरून कुरआन मधील स्त्रीप्रतिमा लक्षात येईल पण तत्पूर्वी स्त्रियांचा दर्जा कसा होता याचा देखील आढावा घेणे गरजेचे आहे.

कुरआन अवतरण्यापूर्वी अरबस्तानमधील स्त्रियांची दुरवस्था

जगातील अत्यंत अक्षम्य पाप केल्यामुळे आपला जन्म अरबस्तानात झाला आहे अशी त्यावेळी प्रत्येक स्त्रीची मानसिकता होती. कारण स्त्रियांना अपशकुनी समजले जात होते. स्त्री म्हणजे केवळ उपभोगाची वस्तू समजली जात असे. अरबस्तानमध्ये काही म्हणी प्रचलित होत्या ''स्त्रिया सैतानाच्या सूत्रधार आहेत, स्त्रियांचे नाव काढले की पुरुषांचा संताप हा व्हायचाच. राष्ट्रकार्यात स्त्रियांना घेऊन काय करायचे. स्त्री म्हणजे मनुष्य जातीवरील महासंकट आहे, कार्याला निघताना स्त्रियांचे तोंड पाहिले की कार्याचा बिघाड झालाच म्हणून समजावे.'' (हजरत महंमद पैगंबर पान ८) यावरून स्त्रीदर्जा किती

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

खालच्या पातळीचा होता याची कल्पना येते. यामध्ये सुधारणा होण्यासाठी, त्यावेळच्या रूढ प्रथांना आळा घालण्यासाठी कुरआनमध्ये स्त्रियांच्या विषयी आयती आलेल्या आहेत.

त्यापैकी काही आयतींचा आधार घेऊन कुरआनमधील स्त्रीप्रतिमा खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

विवाहः

कुरआनमधील आयतींच्या अवतरणापूर्वी विवाहाच्या बाबतीत स्त्रीभावनेचा काहीही विचार न करता अनेक जाचक रूढी त्यांच्यावर लादल्या गेल्या होत्या. वडीलांच्या मृत्यूनंतर संपत्तीचा भाग म्हणून आपल्या सावत्र मातेशी विवाह करणारे महाभाग अरबस्तानमध्ये होते यावर निर्बंध म्हणून सावत्र मातेशी विवाह निषिद्ध मानला आहे. (4.22) परंतु ज्यांनी पूर्वी असे कृत्य केले आहे त्यांचा या आयतीमध्ये केवळ तिरस्कारच केला आहे. त्यांना कोणत्याही प्रकारची शिक्षा किंवा नरकयातनेचे भय दाखवलेले नाही. याशिवाय पती असलेल्या स्त्रिया, जन्म देणारी माता, स्वतःच्या मुली, बहिणी, आत्या, मावश्या, पुतण्या, भाच्या, सूना, आणि जिने दूध पाजले असेल ती माता तसेच सावत्र मुली, मूर्तिपूजक स्त्रिया विवाहासाठी निषिद्ध आहेत.(4. 23,24,2.221)

विवाहाचे योग्य वय किती असले पाहिजे याबाबत कोठेही उल्लेख आलेले नाही. केवळ स्त्री सदाचारी आणि श्रद्धावान असेल तर मेहेर म्हणजेच स्त्रीशुल्क देऊन विवाह करण्याची वैध पद्धत आहे. लपून छपून मैत्रीसंबध ठेवणे पूर्णपणे निषिद्ध मानले आहे.(5.5)

मावशी, आत्या, काका, मामा यांच्या मुली, धर्मयुद्धामध्ये मिळालेल्या, मेहरची रक्कम न घेता स्वेच्छेने विवाहबद्ध होणाऱ्या श्रद्धावान स्त्रिया, योग्यप्रकारे चौकशी करून परीक्षणानंतर हिजारत केलेल्या (मक्केहून मदिनेकडे आलेल्या), श्रद्धावान दासी या सर्व विवाहासाठी योग्य मानल्या आहेत. याशिवाय इतर कोणत्याही स्त्रीचे चारित्र्य कितीही चांगले वाटत असले तरी त्या विवाहयोग्य नाहीत.(33.50, 33.52 तसेच 60.10,11,12) पण पत्नीबरोबर शरीरसंबध होण्यापूर्वी तलाक दिला आणि तिची पहिल्या पतीपासून जर मुलगी असेल तर ती विवाहासाठी वैध मानली आहे. (4.23) अनाथ मुलींचे सौंदर्य, संपत्ती हे त्यांच्याबरोबर विवाह करण्याचे कारण असू नये.(4.3)

कुलीन स्त्रीबरोबर विवाह करण्याची एखाद्याची ऐपत नसल्यास आपल्या श्रद्धावान दासीशी किंवा मालकाच्या परवानगीने इतर दासीशी देखील विवाह करता येईल. (4.25,24.33) पत्नीला शेतीची उपमा दिली आहे. (2.223) ज्याप्रमाणे शेतकरी शेतामध्ये आपल्या इच्छेनुसार बी लावतो आणि पीक मिळवतो त्याप्रमाणे पतीने देखील पत्नीशी नैसर्गिक पद्धतीने वंशवृद्धीच्या उद्देशाने शरीर संबंध ठेवावा. पैगंबरांच्या इच्छेनुसार कोणत्या पत्नीला जवळ करायचे आणि कोणाला दूर ठेवायचे याबाबतीत कसल्याही प्रकारचे बंधन नाही. पैगंबरांच्या पत्नींबरोबर इतरांनी आदरभाव ठेवून पडद्याआड राहून बोलावे, त्यांच्याशी विवाह करणे हे नेहमी निषिद्ध मानले आहे. (33.51,53)

विवाहविषयक या नियमांवरून असे दिसते की, कोणाशी विवाहबद्ध व्हायचे हे ठरविण्याचा पूर्ण अधिकार पुरुषांचा आहे. धर्मयुद्धामध्ये जिंकलेल्या संपत्तीप्रमाणे स्त्रियांशी विवाह करण्याची मुभा दिली आहे. एवढे असताना देखील दासींशी ठेवलेला विवाहबाह्य संबंध देखील धर्मसंमत आहे. अनाथ मुलींचे सौंदर्य आणि संपत्ती विवाहाचे कारण असू नये असे सांगितले असताना देखील पुरुषप्रधानतेमुळे कितपत या नियमाचे पालन होत असावे याबाबतीतही शंकाच आहे. अनेकेश्वरवाद्यांच्या स्त्रियांचे पती असतानाही आणि त्या मूर्तिपूजक असल्यातरी, जिंकलेल्या असल्याने त्या विवाहास वैध मानल्या आहेत. पैगंबरांच्या मृत्यूनंतर इद्दतीचा कालावधी (4 महिने) पूर्ण केला असताना देखील इतर स्त्रियांप्रमाणे त्यांची पत्नी विवाह करू शकत नाही.

पुनर्विवाह

कुरआनमध्ये सांगितल्याप्रमाणे स्त्रियांना देखील पुनर्विवाहाची संधी आहे. त्याबाबत पहिल्या पतीला रोखण्याचा अधिकार नाही. त्यासाठी काही नियम आले आहेत ते पुढीलप्रमाणे

पुनर्विवाह करण्यासाठी स्त्रियांना पाळावयाचा कालावधी म्हणजे इद्दतीचा काळ होय. विधवांसाठी 4 महिने आणि घटस्फोटितेसाठी 3 महिन्यांचा आहे. तो यासाठी की, स्त्रीने गर्भवती नसल्याची खात्री केल्यावर पुनर्विवाह करावा. (2.228,2. 232,234,235) श्रद्धावान स्त्रीला स्पर्श करण्यापूर्वी जर तलाक दिला असेल तर तिला इद्दतीचा कालावधी पाळण्याची गरज नाही. (33.49)

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

म्हणजेच पुनर्विवाहाच्या कालावधीचे बंधन फक्त स्त्रियांच्याच बाबतीत असणार कारण पुरुषाला तसे बंधन असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

विधवा स्त्रियांनी 1 वर्षापर्यंत त्यांच्या पतीच्या घरी उपजीविकेसाठी अवलंबून रहावे. त्यांना घराबाहेर काढले जाऊ नये त्या स्वेच्छेने गेल्यातरच त्यांना जाऊ द्यावे. (2.240)

बहुपत्नीत्वः

धर्मयुद्धामुळे विधवांचा प्रश्न सोडविण्यासाठी, संतती प्राप्तीसाठी, तसेच पत्नीचे सातत्याने आजारी असणे याकारणास्तव बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ झाली.

विवाह करताना चार पर्यंत परवानगी दिली आहे. परंतु सर्वांशी न्यायाने वर्तन करण्याबाबत खात्री असेल तरच अन्यथा एकाच पत्नीचा धर्मपत्नी म्हणून स्वीकार करावा. (4.3) पण पुढे असे देखील सांगितले आहे की, पतीची इच्छा असूनही तो आपल्या सर्व पत्नींशी समानतेने वागू शकत नाही अशावेळी संयम ठेवून ज्या कारणामुळे अन्याय होत असेल ते कारण दूर करण्याचा प्रयत्न करावा. (4.129)

आज मात्र याबाबत अगदी उलट परिस्थिती दिसून येते. आज बहुपत्नीत्वाचे धर्मयुद्ध हे कारण तर राहिलेलेच नाही. शिवाय संतती प्राप्ती किंवा पत्नीचे आजारपण ही कारणे देखील विज्ञानाच्या प्रगतीमुळे नामशेष होत चालली आहेत. परंतु सध्या या आयतींचा सोईनुसार अर्थ लावून स्वतःची वासनापूर्ती वैध मार्गाने पूर्ण करण्याच्या हेतूने बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ झालेली दिसून येते. परंतु आयत अवतरणापूर्वी पत्नींच्या संख्येवर नसलेले बंधन तरी या आयतीद्वारा निश्चित करण्यात आले ही याबाबत समाधानाची बाब मानावी लागेल. याठिकाणी आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, पुरुषांना ज्याप्रमाणे बहुपत्नीत्वाचा आधिकार आहे तसा स्त्रियांना नाही.

पुरुषाने आपल्या दासीशी ठेवलेला शरीर संबंध हा वैध मानला आहे. (23.6, 70.30) तसेच अनाथ विधवा तसेच दास दासींचे विवाह लावणे हे पुण्यकारक कार्य आहे. (24.32) म्हणजेच चार विवाहांची तर मुभा आहेच शिवाय दासींशी देखील विवाहबाह्य संबंध ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे मग त्या दासीची इच्छा असो अथवा नसो त्याचबरोबर दासदासींचे विवाह लावणे किंवा त्यांना दास्यत्वातून मुक्त करणे हे पुण्यकर्म आहे असे सांगितले असताना देखील दोन नियमांपैकी कोणत्या नियम पालनाकडे पुरुषांचे झुकते माप असेल हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

तलाक

तलाक या शब्दाचा अर्थ पत्नीला विवाह बंधनातून मुक्त करणे. धर्म कोणताही असो घटस्फोटीत स्त्रीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन समानच असतो. त्यातही तिच्या पुनर्वसनाचा प्रश्न वेगळाच कारण ती अर्थार्जन करू शकत नसेल तर तिला मरेपर्यंत मरणयातना सहन कराव्या लागतात. आणि कुरआनमध्ये सांगितल्याप्रमाणे अर्थार्जन करणे हे केवळ पुरुषाचे क्षेत्र आहे.

तलाक हा शब्द पतीने तीन वेळा उच्चारला की विवाहबंधनातून मुक्तता होत असे. रागाच्या भरात अशा रीतीने दिल्या जाणाऱ्या तलाक पद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी काही आयती आल्या आहेत.

तलाकची संधी दोन वेळा आहे. म्हणजेच पतीने घेतलेल्या निर्णयावर फेरविचार करण्याची आणि बदलण्याची संधी दोन वेळा आहे. (2.226,227,229,231) इद्दती करीता तलाक द्या. इद्दतीची गणना करा. त्या व्यभिचारी नसतील तर जोपर्यंत स्वेच्छेने घराबाहेर पडत नाही तोपर्यंत त्यांना बाहेर घालवू नका. (65.1ते 4)

म्हणजेच इद्दतीच्या काळात पुनर्विचार करण्याची व विवाह संबध टिकविण्याची संधी दोनदा आहे पण तिसऱ्यांदा तलाकनंतर जर तिच्या दुसऱ्या पतीने तलाक दिला तरच पुन्हा पहिल्या पतीशी विवाहबद्ध होता येते.(2.230)

स्त्रियांची इच्छा विचारातच घेतली नाही येथे केवळ तिच्या दोन पतींच्या इच्छेचा विचार केला आहे. अर्थात तलाक देण्याचा पूर्ण आधिकार त्यावेळी केवळ पतीलाच आहे असे हा नियम सांगतो. तलाक होणे न होणे हे पतीच्या इच्छेवर अवलंबून आहे.

पतीपत्नीतील भांडण मिटवण्यासाठी दोघांच्या कुटुंबातून एक पंच नेमावा आणि सहकार्याने समेट घडवावा. (4. 35)पत्नीला तलाकची पूर्व कल्पना आली असेल तर तिने पतीला त्या निर्णयापासून परावृत्त करावे. (4.128)

पत्नीशी संबंध होण्यापूर्वी तलाक दिला आणि मेहरची रक्कम अनिश्चित असेल तर आपापल्या ऐपतीप्रमाणे, निश्चित असेल तर त्यातील निम्मी द्यावी. परंतु याबाबतीत देखील स्त्रियांनी उदारता दाखवावी. (2.236,237) तलाक होण्यापूर्वी दिलेले

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

मेहेर तसेच भेटवस्तू पुन्हा वसूल करू नये. (4.20) मेहेर अनंदाने द्या स्वेच्छेने द्या पत्नीने जर नाकारले तरच त्यावर पतीचा हक्क आहे. (4.4) मेहेर म्हणजे विवाह प्रीत्यर्थ पतीकडून पत्नीला दिली जाणारी भेट आहे. ते आनंदाने देणे हे पतीचे कर्तव्य आहे.

तलाक दिलेल्या स्त्रीचे बाळ लहान असल्यास 2 वर्षांपर्यंत दूध पाजावे तोपर्यंत तिच्या खर्चाची जबाबदारी तिच्या पतीची असेल. कुवतीपेक्षा जास्त कष्ट देऊ नये. आईला तिच्या बाळाबद्दल त्रास देऊ नये (2.233) तलाक दिलेल्या स्त्रीला उपजीविकेसाठी ठराविक रक्कम द्यावी. (2.241) तसेच कुवतीनुसार घर व गर्भवती असल्यास प्रसूतीपर्यंतचा खर्च देणे बंधनकारक आहे. (65.6) कुवतीनुसार शब्द याठिकाणी महत्त्वाचा आहे कुवत नसेल तर आणि कुवत असलीच तरी तलाक दिलेल्या स्त्रिला पतीने घर दिल्याचे उदा. आढळत नाही.

त्याकाळी अरब लोकांत एक प्रथा रूढ होती की, जे आपल्या पत्नीला 'तू मला माते समान आहेस' असे म्हणत त्याची पत्नी आयुष्यभर त्याच्या करीता विवाहसंबध ठेवण्यासाठी निषिद्ध ठरत असे. त्याला 'जिहार' असे म्हणत. जे लोक आपल्या पत्नीशी जिहार करतात त्यामुळे पत्नी त्यांच्या माता होत नाही. केवळ जन्म देणरीच माता असते. जे लोक असे करतील त्यांना कफ्फारा (प्रायश्चित्त) म्हणून एका दासाची किंवा दासीची मुक्तता करावी. (58.2,3)

सदाचार आणि चारित्र्यसंपन्नता

कुरआनमध्ये स्त्रियांच्या सदाचाराच्या बाबतीत काही निकष आले आहेत ते पुढील प्रमाणे–

स्त्रियांनी आपली नजर नेहमी खाली ठेवावी, शील, अब्रूचे रक्षण करावे. आपल्या सौंदर्याचे प्रदर्शन करीत फिरू नये. लाचारी असेल तर हरकत नाही. नियमितपणे छातीवर ओढणी असावी. आपला शृंगार फक्त पतीसाठी करावा. केवळ आपले पिता, पुत्र, सासरे, सावत्र मुले, भाऊ, भावाची बहिणीची मुले, समवयस्क मैत्रिण, दासी आणि कमी वयाचे दास व मुले यांच्यासमोर यायला हरकत नाही. पैंजणाचा आवाज ऐकविण्यासाठी पाय अपटून चालू नये. (24.31) एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीची निंदा नालस्ती करू नये. (49.11) नमाज पठण, दानधर्म, रोजे, मनावर ताबा ठेवणे, अल्लाहचे स्मरण करणे हे सदाचाराचे लक्षण सांगितले आहे. (33.33,35) सदाचारी स्त्रीवर आरोप लावणाऱ्याला इहलोक आणि परलोक या दोन्ही ठिकाणी शिक्षा भोगावी लागेल. (24.23)

बुरखा परिधान करण्याविषयीचे नियम

सुशील, सदाचारी स्त्रिया ओळखल्या जाव्यात, त्यांना त्रास देण्याचे धाडस देखील कोणी करू नये, यासाठी स्त्रियांनी पिता, पुत्र, भाऊ, भाचे, पुतणे, शेजारच्या स्त्रिया आणि स्वतःच्या दासी यांच्याशिवाय इतरांच्या सामोर बुरखा परिधान करावा. (33.59, 33.55)

वारसा हक्क

मृत माता, पिता आणि नातेवाईकांच्या संपत्तीमध्ये स्त्रियांचा देखील अधिकार आहे.(4.7) त्यामध्ये पुरुषापेक्षा निम्मा वाटा स्त्रीचा आहे. जर दोनपेक्षा जास्त फक्त मुलीच असतील तर त्यांना 2/3 आणि एकच मुलगी असेल तर निम्मा वाटा मिळेल. मृताला जर अपत्य असतील तर आई वडिलांना 6वा भाग आणि अपत्य नसतील तर पूर्ण भाग आणि त्यातील आईला 3रा भाग मिळेल. मृताला अनेक बहिण भाऊ असल्यास आईला 6वा भाग मिळेल. मृत व्यक्तिच्या कर्जफेडीनंतर उरलेल्या संपत्तीची वाटणी अशाप्रकारे असेल. (4.11)

मृताला आई, वडिल किंवा अपत्य नसेल तर आणि एक, दोन आणि जास्त बहीणी असतील तर अनुक्रमे निम्मा, दोन तृतियांश, भावाच्या निम्मा भाग मिळेल. (4.177) मृताला एक भाऊ व एक बहीण असेल तर प्रत्येकी सहावा भाग मिळेल आणि त्यापेक्षा जास्त असतील तर एक तृतीयांश भागामध्ये सर्वांची वाटणी असेल.(4.12)

अपत्य नसलेल्या पत्नीच्या मृत्यूनंतर तिच्या संपत्तीतील अर्धा; अपत्ये असतील तर पाव भाग मिळेल. आणि अपत्य रहित पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला पाव भाग मिळेल. जर अपत्ये असतील तर आठवा भाग पत्नीला मिळेल. (4.12)जबरदस्तीने स्त्रियांचे वारस बनण्यास कुरआनने निषिध्द मानले आहे. (4.19)

वारसा हक्काबाबत आलेल्या आयतींमध्ये स्त्रीला कमी वाटा मिळण्याचे कारण म्हणजे इस्लाम धर्मामध्ये अर्थिक जबाबदारी पूर्णपणे पुरुषांवर आहे असे दिसून येते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

व्यभिचारी स्त्री आणि शिक्षा

व्यभिचारी स्त्री आणि पुरुषांना 100 चाबकाच्या फटक्यांची समान शिक्षा आहे. (24.2) एखाद्याने कुलीन स्त्रीवर व्यभिचाराचा आरोप लावला आणि त्याबाबत चार साक्षीदार आणले नाहीत तर त्याला 80 चाबकाचे फटके मारावेत आणि इतर कोणत्याही खटल्यात त्याची साक्ष मान्य करू नये. (24.4)

जर पतीने पत्नीवर व्यभिचाराचा आरोप केला आणि त्याबाबत साक्षीदार नसतील तर अल्लाहची 4 वेळा शपथ घेऊन म्हणावे की हा आरोप सत्य आहे. पाचव्या वेळी शपथ घेऊन म्हणावे जर हा आरोप खोटा असेल तर अल्लाहतर्फे माझा धिक्कार असो. त्याविरोधात स्त्रीने अल्लाहची चार वेळा शपथ घेऊन सांगावे की, हा अरोप खोटा आहे आणि 5व्या वेळी म्हणावे की, हा आरोप खरा असेल तर अल्लाहचा प्रकोप माझ्यावर कोसळेल. (24.6)

या आयतीमध्ये देखील स्त्रीवर खरे खोटेपणा सिद्ध करण्याच्या बाबतीत केलेला अन्याय दिसून येतो. म्हणजे पुरुष खोटा ठरला तर अल्लाहतर्फे केवळ धिक्कार आणि स्त्री खोटी ठरली तर अल्लाहच्या प्रकोपाला सामोरे जाण्याची शिक्षा तिला भोगावी लागणार.

या आयतीच्या सुरूवातीलाच म्हटले आहे की, 'तुमच्या स्त्रियांपैकी' म्हणजेच त्या पुरुषाच्या अनेक पत्नी असणे हा व्यभिचार नाहीच. शिवाय साक्षीदार खरेदी करता येतात हे देखील विचारात घेतले पाहिजे.

व्यभिचारी स्त्रीचा आरोप चार जणांच्या साक्षीने सिद्ध झाला तर तिला मरेपर्यंत घरात डांबून ठेवण्याची शिक्षा सांगितली आहे. (4.15) ज्या स्त्रियांविषयी उध्दटपणाची शंका असेल तर त्यांना पुरुषांनी समजावून सांगितले पाहिजे, त्यांच्याशी शरीर संबध ठेवू नये तसेच त्यांना पुरुष मारहाण देखील करू शकतात. मग जर त्यांनी आज्ञापालन केले तर मात्र त्यांच्या विरूध्द सबब शोधू नका. (4.34)

म्हणजेच व्यभिचाराचा आणि उद्धटपणाचा आरोप लावणारे पुरुषच आणि शिक्षा देणारेही पुरुषच आहेत शिक्षा भोगणारी केवळ स्त्री आहे.

व्यवहारज्ञान

स्त्रियांना अर्थार्जनाचा अधिकार नाही त्यामुळे व्यवहारज्ञान देखील शून्यच असणार असे गृहीतच धरलेले दिसते. उदा.कर्जाच्या बाबतीमध्ये लिहून ठेवताना दोन पुरुष नेमावेत जर दोन पुरुष नसतील तर एक पुरुष आणि दोन स्त्रिया नेमाव्यात. दोन यासाठी की एक चुकली तर दुसरीने तिला आठवण करून द्यावी. (2.282) लोकांनी शपथ घेतली असता ती मोडू नये हे स्पष्ट करण्यासाठी एका स्त्री चे उदा दिले आहे की, जी स्वतःच कष्टाने कातलेल्या सूताला स्वतःच ओरबाडून टाकते. (16.92)

परलोकातील स्त्रीचे स्थान

स्त्रियांच्या इहलोकातील चांगल्या–वाईट कर्माप्रमाणे परलोकातील स्वर्ग–नरक असे परलोकातील स्थान असेल. (4. 32, 9.68, 9.70, 1.97, 33.29,30,31,53.12, 57.13, 85.10, 11 वगैरे.) काही ठिकाणी सदाचारी पुरुषांना परलोकामध्ये खाली नजरा असलेल्या समान वयाच्या, दिव्य, ज्यांना पूर्वी एखाद्या मानवाने किंवा जीन्नने (अदृश्य योनी) स्पर्श केला नसेल, हिऱ्याप्रमाणे सुंदर आणि शिंपल्यातील मोतीप्रमाणे किंवा अंड्यातील पांढऱ्या बलकाप्रमाणे सुरक्षित मृगनयनी कुमारीका मिळतील असे वर्णन आले आहे. (37.48, 39, 44.54,52.20,55.56,58,72,74,56.22,23,35,36,37)

या आयतीवरून असे दिसते की स्त्रीचे इहलोकात आणि परलोकातील दर्जामध्ये फारसा फरक नाही. सदाचारी स्त्रीला सद्वर्तनामुळे स्वर्गप्राप्ती झालीच तर तेथे देखील ती केवळ पुरुषांच्या उपभोगाची वस्तूच असेल. स्वर्गामध्येदेखील स्वतंत्रपणे सुखोपभोग घेण्याचा अधिकार नाही.

स्त्री भ्रूणहत्या

अरबस्तानात जन्मलेल्या मुलीला जिवंत गाडले जात असे त्याला निर्बंध घालण्यासाठी म्हटले आहे की, कयामतच्या दिवशी जिंवत गाडलेल्या मुलीला विचारले जाईल की, 'तुला कोणत्या अपराधामुळे गाडले होते.'(81.8,9)

इहलोकातील अन्यायाचा बदला स्त्रीला परलोकात मिळण्याचे आश्वासन दिले आहे. इस्लाम धर्मामध्ये स्त्रीभ्रूणहत्या निषिद्ध मानली आहे. तरीही स्त्रीभ्रूणहत्येच्या वाढत्या प्रमाणामध्ये इस्लाम धर्मीयांचा देखील हातभार दिसून येतो.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

उपसंहार

कुरआन अवतरणाला 1400 वर्षे उलटून गेली आहेत त्या वेळच्या आणि सध्याच्या परिस्थितीमध्ये निश्चितच बदल झाला आहे. त्यामुळे परिस्थितीनुसार बदलण्याची गरज आज देखील आहे. परंतु तसे दिसून येत नाही. याउलट पुरुष कुरआनमधील आयतींचा सोईनुसार अर्थ लावततातच त्याचबरोबर नवनवीन स्त्रियांना जाचक कायदे देखील काढतात. उदाहरणच द्यायचे झाले तर पाकिस्तानातील तहमीन दुर्रानी या लेखिका 'माय फ्युडल लॉर्ड' या आत्मचरित्रात लिहितात– ''आपल्या पत्नीच्या चारित्र्याचा संशय घेण्याचा परंपरागत पुरुषी अधिकार तर पाकिस्तानी पुरुष वापरतोच शिवाय नोकरीनिमित्त परदेशी जाणाऱ्या पुरुषांना, आपल्या माघारी आपल्या पत्नीचा भरवसा वाटत नाही म्हणून मग ते 'हद्द' कायद्याचा आधार घेतात तिच्यावर अनैतिक संबंध ठेवल्याचा आरोप करून, तिला तुरूंगात सुरक्षितपणे(?)ठेवतात. आजदेखील 'हद्द' कायद्यामुळे हजारो निरपराध स्त्रिया पाकिस्तानी तुरुंगात खितपत पडल्या आहेत, असा स्त्रीवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचा दावा आहे. 1979 मध्ये हा 'हद्द' चा कायदा झाला. 1988 मध्ये 'झीना' कायदा केला. 'झीना' कायद्यानुसार कोणीही कोणत्याही स्त्रीवर अनैतिक वर्तनाचा आरोप ठेवू शकतो तिला तुरुंगात टाकू शकतो, खरे–खोटे साक्षी पुरावे सादर करून फटक्याची शिक्षा किंवा दगडांनी ठेचून मारण्याची शिक्षाही करू शकतो. जास्तकरून अशिक्षित, अडाणी, गरीब समाजातील स्त्रियाच या कायद्याला बळी पडतात.'' (अंतर्नाद मार्च 2015 पृष्ठ 9)

स्त्रियांनी कुरआनमधील आलेल्या नियमांचे उल्लंघन केले तर तो अपराध मानला जातो आणि तिला शिक्षा दिली जाते. अल्लाहच्या आदेशाचे उल्लंघन केले तर तिला शिक्षा देणारा अल्लाह असताना देखील शिक्षा देण्यात पुढाकार पुरुषच घेतात. परंतु पुरुषांनी स्वेच्छेने बदल करून नवीन कायदे काढले तरी तो अपराध मानला जात नाही. त्यांना शिक्षाही होत नाही ही खेदजनक बाब आहे.

अन्याय सहन करणे अपराध मानला जातो. त्या विरोधात लढणाऱ्या स्त्रिया देखील होत्या आणि आहेत. परंतु त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. मग त्यामध्ये तस्लिमा नसरिन असो, इस्मत चुगताई असो, मलालाई जोया असो, 'रावा' (त्मअवसनजपवदंतल ◌ेवबपंजपवद व ि◌जीम ॅवउमद व ि।हिंदपेजंद) या संस्थेची संस्थापिका मीना असो, किंवा 'अफगाण विमेन्स मिशन' ची संचालिका सोनाली कोल्हटकर असो यांनी आपला जीव मुठीत ठेवून दिलेला लढा आपल्यासाठी आहे याची कल्पना देखील सर्वच मुस्लीम स्त्रीयांना आहे की नाही याबाबत शंकाच वाटते. इस्लाम धर्मातील स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाची तसेच अधिकाराची तिला जाणीव देखील नाही. या शोधनिबंधाद्वारा ती जाणीव निर्माण व्हावी अशी अपेक्षा करते. लेखनविस्तार भयास्तव काही ठळक मुद्यांचा आणि आयतींचाच आधार घेतला आहे.

संदर्भ ग्रंथः

1.अंतर्नाद मार्च 2015 अंक

2.शम्स पीरजादा (भाष्यकार), मुहम्मद शफी अन्सारी (अनुवादक), ' दअ्वतुल कुरआन खंड 1,2,3', इदरा दअ्वतुल कुरआन, 1996

3.सय्यद अबुल आला मौदूदी (भाष्यकार), अब्दुल कुरेशी, कुतुबुद्दीन व मुबारक मनियार (अनुवादक), 'दिव्य कुरआन', इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स, मिरज, 1991

4. सय्यद अहमद अमीन, 'हजरत महंमद पैगंबर'

5. सय्यद जलालुद्दीन उमरी(लेखक), सय्यद झाकीर अली (अनुवादक),'मुस्लिम स्त्रीचे अधिकार त्यावरील आक्षेपांचा आढावा' इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स, मुंबई,2007

6. हजरत मौलाना अब्दुल करीम पारेख साहेब (अनुवादक), 'तशरीहुल कुरआन मराठी भाषांतर पवित्र कुरआन', फरीद बुक डेपो,नवी दिल्ली 2.